# शून्यातून सौंदर्याकडे

**कागल नगरपरिषदेने हागणदारीमुक्त, घनकचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिक बंदी या त्रिसुत्रीचा अवलंब करून कागल शहराला सुंदर व स्वच्छ केले. नगरपरिषदेने शासन योजना आणि लोकसहभागाचा समन्वय प्रभावीरीत्या साधला. स्वच्छ, सुंदर आणि स्मार्टसिटीच्या दृष्टीने राबवलेले स्वच्छ कागल अभियान मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाले आहे. ओला कचरा आणि सुका कचरा यांचा उपयोग उत्तमरीत्या करण्याचे नियोजन नगरपालिकेने केले आहे. कचऱ्याच्या मदतीने खत निर्मिती व वीज निर्मिती प्रकल्प राबवण्यात येत आहे. शुन्य कचरा ही संकल्पना राबवणारी कागल नगरपरिषद ही राज्यातील बहुतांशी पहिलीच नगरपरिषद ठरत आहे.**

संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानातून दिशा घेऊन कागल नगरपरिषदेने दोन वेळा विभागीय पातळीवरील आणि एकदा राज्यस्तरीय बक्षीस पटकावले असून कागलकरांना खऱ्या अर्थाने आता स्वच्छतेची सवयच जडली आहे. त्यामुळेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र




## घनकचरा निर्मूलन

**हागणदारीमुक्ती बरोबरच घनकचरा निर्मुलनाचे मोठे काम कागल नगरपरिषदेने करून राज्याला एक नवी दिशा देण्याचा चालवलेला प्रयत्न कौतुकाचा विषय बनला आहे. ओल्या कचऱ्यापासून वीजनिर्मितीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प कागल नगरपरिषदेने हाती घेतला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजनेतून साडेतीन कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेतला असून तो अंतिम टप्प्यात आहे. या उपक्रमातून ५ एकर जागेत कचऱ्याचे विलगीकरण केले जात आहे. शहरात तसेच नजीकच्या एमआयडीतून निर्माण होणारा ओला तसेच सुका कचरा 'हाऊस टू हाऊस' जाऊन १०० टक्के उचलला जावा. यासाठी जवळपास १४ हजार बकेट साडेसात हजार मालमत्ता धारकांना मोफत पुरवण्यात आल्या असून हा कचरा जीपीएस प्रणालीच्या वाहनामार्फत दररोज उचलला जातो.**

फडणवीस यांनी सुरू केलेले स्वच्छ महाराष्ट्र अभियान कागल नगरपरिषदेने मनापासून राबवले असून हागणदारीमुक्त कागल बरोबरच शुन्य कचरा ही संकल्पना राबवण्याचा बहुमानही कागल नगरपरिषद अगामी काळात पटकावेल, यात मात्र शंका नाही. यामुळेच राज्याच्या नगरपरिषद प्रशासनाच्या प्रधान सचिव श्रीमती मीता



राजीवलोचन यांनी कागल नगरपरिषदेच्या स्वच्छताविषयक कामाचे कौतुक केले आहे.

## घर तिथे शौचालय

कागल शहरात घर तिथे शौचालयाची संकल्पना राबवून संपूर्ण शहर हागणदारीमुक्त बनवण्यात पुढाकार घेतला गेला. ८ हजार ३०० कुटुंबापैकी साडेसात हजार कुटुंबाकडे शौचालये आहेत. शहरात २१९ इतकी सार्वजनिक शौचालये उभारण्यात आली आहेत. त्याचा वापर नागरिकांनी अधिकाधिक करावा यासाठी नगरपालिकेमार्फत प्रयत्न केले जात आहेत. या शौचालयाच्या स्वच्छतेसाठी विशेष काळजी घेण्यात येते.

कागल नगरपरिषदेने उभारलेले मॉडेल सार्वजनिक शौचालय हे आदर्श शौचालय ठरले आहे. ते पाहण्यासाठी अन्य नगरपालिकांचे प्रतिनिधी येत आहेत. २७१ वैयक्तिक शौचालये स्वच्छ महाराष्ट्र अभियानातून निर्माण केली आहेत. १८ डिसेंबर २०१५ रोजी कागल नगरपरिषद १०० टक्के हागणदारीमुक्तीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्याकडे कागल नगरपरिषदेच्या वतीने सादर केला आहे. संपूर्ण हागणदारीमुक्त शहर संकल्पनेला यश



शहरातून दररोज निर्माण होणारा ओला तसेच सुका कचरा डंपिंग ग्राऊंड येथे आणले जाते. त्याठिकाणी त्याचे काळजीपूर्वक विलगीकरण केले जाते. यामध्ये ओला कचऱ्याचा उपयोग वीजनिर्मितीसाठी करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने योग्य ती उपाययोजना सुद्धा करण्यात येत आहे. तर सुका कचरा गांडुळखत निर्मितीसाठी वापरला जातो. तसेच प्लास्टिक, काचा, रबर असा कचरा पुनर्वापरासाठी विकला जात आहे.




त्यातून नगरपरिषदेला उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध झाला आहे.

दररोज साधारणत: ४ टन ओला कचरा निर्माण होतो. या कचऱ्यापासून वीजनिर्मिती करण्यासाठी जर्मन तंत्रज्ञान निर्माण तंत्रज्ञानाचे सहकार्य देण्यात येत आहे. या कचऱ्यापासून ५ मेगावॅट वीज निर्मिती होऊ शकते. त्या अनुषंगाने अत्याधुनिक प्रकल्प उभा केला जात आहे. यातून निर्माण होणाऱ्या वीजेमुळे शहरातील १४०० स्ट्रीट लाईट झळाळणार आहेत.

वीजनिर्मिती प्रकल्पामुळे नगरपरिषदेचे दोन ते अडीच लाख रुपयांची दरमहा बचत होणार आहे. याबरोबरच सुक्या कचऱ्यापासून दररोज दीड टन खत निर्मिती केली जात असून हे खत शेतकऱ्यांना तीन रुपये प्रतिकिलो दराने उपलब्ध करून दिले जात आहे. या खत निर्मिती प्रकल्पामुळे नगरपरिषदेला आर्थिक उत्पन्नाचे मोठ साधनही निर्माण झाले आहे.

वीजनिर्मिती व खत निर्मिती प्रकल्पामुळे कागल नगरपरिषदेने शुन्य कचरा संकल्पनेची जननी ठरत आहे. हे मात्र निश्चित.

---

मिळण्यासाठी ३ गुडमॉर्निंग पथकांची स्थापना करण्यात आली आहे. शिवाय ५० कर्मचारी विशेत्वाने नियुक्त करण्यात आले आहेत. या सर्व प्रयत्नांमुळे लोकसहभाग वाढला. त्यातून हागणदारीमुक्तीची वाट सुकर झाली आहे.

## उत्स्फूर्त सहभाग

मुंबई- बंगळूरु या राष्ट्रीय महामार्गावर कोल्हापूर शहरानजिक वसलेल्या शताब्दी महोत्सवी कागल नगरपरिषदेने स्वच्छ महाराष्ट्र अभियानात सक्रिय सहभाग घेऊन हागणदारीमुक्त कागल नगरपरिषद बनविण्याचा केलेला प्रयत्न लाख मोलाचा आहे. राज्याच्या नगरविकास विभागाच्या सचिव मनिषा पाटणकर-म्हैसकर यांनी राज्यात नागरी स्वच्छता अभियान गतीमान करुन नागरी भागात स्वच्छतेची सप्तपदी स्वच्छतेची हा उपक्रम प्रभावीपणे राबवला. त्यांच्या आवाहनास उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन कागल नगरपरिषदेने स्वच्छतेची सप्तपदी पूर्ण केली असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. कागल नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष श्रीमती संगीता प्रकाश गाडेकर, उपनगराध्यक्ष श्रीमती उषाताई सोनुले, पक्षप्रताद रमेश माळी तसेच मुख्याधिकारी प्रभाकर पत्की यांनी सर्व नगरसेवक-नगरसेविका तसेच नागरिकांना बरोबर घेऊन स्वच्छतेची सप्तपदी पूर्ण केली आहे.

**एस. आर. माने**

सुक्या कचऱ्याचा वापर गांडुळखत निर्मितीसाठी केला जात आहे. या खताला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

